लोकमत

आय विटनेस

# श्रमदानातून फुलतेय नंदनवन...



वाशिम जिल्हा परिषदेचा संपूर्ण परिसर हिरवागार करण्याचे उद्दिष्ट विद्यमान सीईओ वैभव वाघमारे यांनी बाळगले आहे. मात्र, खड्डे खोदण्यापासून वृक्षलागवड करण्यापर्यंत आणि वृक्षांची जोपासना करण्यासाठी कुठलेही अतिरिक्त मनुष्यबळ न ठेवता कर्मचाऱ्यांनीच श्रमदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्मचाऱ्यांकडूनही त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला जात असून, १६ फेब्रुवारी रोजी वृक्षलागवड मोहिमेत हिरिरीने सहभागी झालेले कर्मचारी.

लोकमत

# हॅलो वाशिम

https://epaper.lokmat.com

## श्रमदानातून जिल्हा परिषदेत 'आनंदवन' साकारणार



### वृक्षारोपण अन् संगोपनही...

वृक्षारोपण केल्यानंतर या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारीदेखील अधिकारी, कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आली. वृक्षारोपण व संगोपनाची जबाबदारी घेताना अधिकारी, कर्मचारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** श्रमदानातून विविध वृक्षांची लागवड करून जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत परिसर स्वच्छ व सुंदर करण्याचा संकल्प मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी केला आहे. त्यासाठी सर्व विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन आठवड्यातील एक दिवस श्रमदान करण्यात येते. जिल्हा परिषदेत 'आनंदवन' साकारण्यासाठी बुधवारी (दि. २८) सर्व अधिकारी व कर्मचारी हातात टिकाव, फावडे व डोक्यावर टोपले घेऊन धडपडत असल्याचे पाहावयास मिळाले.

### जोर लगा के...

वृक्षारोपणासाठी खड्डे खोदण्यात येत आहेत. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणताही पडदा न ठेवता खड्डे खोदण्यासाठी हाती टिकास घेऊन असा 'जोर' लावला.



### टोपलं घ्या टोपलं...

- एका टोपल्यात काही झाडे ठेवून ते वृक्षारोपणस्थळी नेण्यात आले.
- झाडे असलेले टोपले वाहण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्साह दिसून आला.





वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन तसेच जिल्हा परिषद परिसरात आनंदवन साकारण्यासंदर्भात चर्चा करताना सीईओ वैभव वाघमारे.